# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६ ००४.

**परिपत्रक क्र.कोविमं/ए-२/उ.मा./प्रात्य./एप्रिल- मे २०२१/०४६/दिनांक ०६ एप्रिल २०२१**

**विषय :- प्रात्यक्षिक व भाषा विषयांच्या तोंडी परीक्षेचे साहित्य वाटपाबाबत तसेच स्विकारण्याबाबत**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र एप्रिल-मे २०२१ परीक्षेच्या शास्त्र, तंत्र, व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक विषयांची **प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा शनिवार दिनांक २२/०५/२०२१ ते गुरुवार दिनांक १०/०६/२०२१** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. याबाबत यापूर्वीच क्रकोविमं/उ.मा./माध्य.गोप./२०२१/७५०४ दिनांक २२/०३/२०२१ रोजीचे सूचनांचे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस देण्यात आले आहे ते वाचा. कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांचे गट (बॅचेस) पाडून प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे नियोजन करण्यात यावे. पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यानी तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा नव्याने देणेची आहे.

सदर प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे **गोपनीय साहित्य जिल्हा वितरण केंद्रावर शुक्रवार दिनांक ०९ एप्रिल २०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेत वितरीत केले जाईल.** तरी सदर दिवशी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधीस अधिकार पत्र देवून निर्धारित वेळेत वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी. आपणाकडून वरील दिवशी साहित्य स्विकारले गेले नाही तर ते त्याच वितरण केंद्रांवरुन प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेच्या अगोदर परस्पर घेवून जाण्याची जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी. आपण सदरचे साहित्य वेळेवर स्विकारले गेले नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय झाल्यास मंडळ जबाबदार राहाणार नाही याचीही नोंद घ्यावी.

तसेच " **माहिती तंत्रज्ञान** " या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेकरिता मंडळाकडून चार पानी पुरवणी उत्तरपत्रिका दिली असून प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक लेखी स्वरुपात असने बंधनकारक आहे व त्यासोबत प्रात्यक्षिक कोडींगचे प्रींटही जोडणे आवश्यक आहे. इतर विषयांच्या प्रमाणेच सदर विषयाचेही मुल्यांकन करुन स्वतंत्र पाकीट सिलबंद करुन मंडळाकडे पाठवावी.

सन २०२०-२०२१ मध्ये इ.१२ वी मध्ये शिकणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांसाठी " **माहिती तंत्रज्ञान**" विषयाची परीक्षा **ऑनलाईन-पध्दतीने दिनांक २२/०५/२०२१ , दि.२४/०५/२०२१ व २५/०५/२०२१ रोजी सकाळी १०.३० ते १.३० व दुपारी ३.०० ते ६.००** या वेळेत घेण्यात येणार आहेत. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादीत संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्यास ती गटागटामध्ये घेण्यात यावी. यासाठी सदरचे तीन दिवस देण्यात आलेले आहेत. यासाठी कनिष्ठ महाविद्यालयानी त्यांच्या संगणक प्रयोगशाळेच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करावेत. त्याप्रमाणे त्यानी **परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीपूर्वी माहित करुन देणे आवश्यक आहे याची कटाक्षाने नोंद घ्यावी.** तसेच ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आपण आपल्या स्तरावर आपल्या कार्यक्षेत्रातील विद्युत मंडळ, दुरध्वनी कार्यालय व इंटरनेट सेवा पुरविणाऱ्या संस्थाना आपली सेवा अखंडीतपणे मिळण्याबाबत लेखी विनंती करण्यात यावी.

प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका, गुणपत्रिका, गैरहजेरी अहवाल, देयके, गोपनीय अहवाल इत्यादी सर्व कागदपत्रे विषयनिहाय सुचना दिल्याप्रमाणे मंडळाने पुरविलेल्या स्वतंत्र पाकीटांमध्ये

कृ.मा.प.

सिलबंद करुन संबंधित जिल्हा स्वीकृती केंद्रावर **शुक्रवार दिनांक ११/०६/२०२१** रोजी देण्यात यावे. भाषा व इतर विषयांच्या गुणपत्रिका तसेच ग्रेडलिस्ट स्वतंत्र पाकिटामध्ये सिलबंद करुन पाकिटावर विषयांचा व कनि.महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांकाचा स्पष्ट उल्लेख करुन जिल्हा वितरण केंद्रावर प्रात्यक्षिक साहित्यासोबतच देण्यात यावे.

एप्रिल–मे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक, भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षेच्या कार्यक्रमाची नोंद प्राचार्यांनी घ्यावी. वितरण केंद्रावर साहित्य नेण्यासाठी व जमा करणेसाठी आपल्या प्रतिनिधींना पाठविण्याची व्यवस्था करावी.

(देविदास कुलाळ)
प्र. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रति, १) प्राचार्य, सर्व कनिष्ठ महाविद्यालये , सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्हे

**२) वितरण केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रात्यक्षिक परीक्षापूर्व गोपनीय साहित्य शुक्रवार दिनांक ०९ एप्रिल २०२१ रोजी वितरित करण्यात यावे व परीक्षोत्तर साहित्य शुक्रवार दि.११/०६/२०२१ रोजी स्विकारून सदरचे साहित्य (उत्तरपत्रिका, देयक, गुणतक्ते पाकीटे इ. याप्रमाणे कनि.महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय) वर्गीकरण करून तशा याद्या दिनांक १२/०६/२०२१ पर्यंत तयार करून ठेवाव्यात व हे साहित्य आणणेसाठी मंडळाचे प्रतिनिधी आपणाकडे दि.१३/०६/२०२१ रोजी टेम्पो घेऊन येतील तेव्हा टेम्पोमध्ये भरण्याची व्यवस्था करावी. आपले साहित्य ओळखता यावे यासाठी लेबल तयार करून चिटकवावेत व हे स्विकारलेले साहित्य ताब्यात देणेसाठी सोमवार दिनांक १४/०६/२०२१ रोजी मंडळ कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.**